जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०८/०१/२०२५
## दि.०७/०१/२०२५ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे १४/२०२५, भा.न्या.सं.कलम,१०३(१),भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५),सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७(१)(३) सह १३५ |
| **फिर्यादी** | एक महिला वय २६ वर्षे, रा.काळेवाडी फाटा,पिंपरी |
| **आरोपीत** | कृष्णा सत्यनारायण कनोजा वय २८ वर्ष रा.खैरेवाडी शिवाजीनगर पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०७/०१/२०२५ रोजी साधारण सायंकाळी १८/००.वा.सुमारास डब्लु.एन.एस.कंपनी विमानगर पुणे येथील पार्कीग मध्ये. |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची बहिण नामे शुभदा कोदारे वय २८ वर्ष रा.बालाजी नगर कात्रज पुणे हि डयुटीवर जाण्याकरिता तिचे मैत्रीणीसह डब्लु एन.एस.कॉल सेंटर या कंपनीच्या इमारतीच्या पार्कीग मध्ये थांबलेली असताना तिच्या कंपनीत काम करणार मुलगा कृष्णा कनोजा,यांने ऊसणे दिलेले पैशाच्या कारणावरून तिच्या उजव्या हातावर धारधार शस्त्राने वार करुन गंभीर जखमी करुन तीस जीवे ठार मारले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे),श्रीमती पल्लवी मेहेर,मो.न.८१०८२५६६९९ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे १८/२०२५, भा.न्या.सं.कलम ११५,१८९(१),१८९(२),३२४,१३१,१९० महाराष्ट्र वैद्यकिय सेवा संस्था (हिंसक कृत्ये व मालमत्तेची हानी किंवा नुकसान यांस प्रतिबंध) अधिनियम २०१० चे कलम ३ व ४ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ११२,११७ |
| **फिर्यादी** | एक महिला वय ३६ वर्षे,रा.उन्ड्री,पुणे |
| **आरोपीत** | दोन इसम व त्यांचेसोबत इतर ०३ महीला व ०१ पुरुष (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/०१/२०२५ रोजी दुपारी १२/२० वा.चे सुमा.आर्थो ओ.पी.डी बाहेर,भारती हॉस्पिटल, धनकवडी, पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया नमुद ठिकाणी असतांना वर नमुद केले ता.वेळी यातील नमुद इसम यांनी गैरकायद्याची मंडळी एकत्र जमुन त्यांचे नातेवाईक वय ८६ वर्षे यांचे मृत्युस हॉस्पिटल प्रशासन जबाबदार आहे असा राग मनात धरुन हॉस्पिटल मध्ये येवुन फिर्यादी यांना तसेच फिर्यादी यांचे सोबतचे महीला सिक्युरीटी,व इतर हॉस्पिटल प्रशासनातील स्टाफ यांना शिवीगाळ,दमबाजी करुन आरडा ओरडा करुन हॉस्पिटल मधील स्टुल उचलुन घेवुन इलेक्ट्रिक पॅनेल रुमचे काचेवर मारुन तोडफोड करुन शांततेचा भंग करुन दहशत निर्माण केली. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.स्नेहल थोरात,मो.नं.८६२३०७४००० |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पर्वती पो स्टे ०८/२०२५, भा.न्या.सं.कलम ३१८(४),३१९(२) माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ,६६(डी) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ८० वर्ष रा.अरण्येश्वर पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/१२/२०२४ ते दि.१८/१२/२०२४ रोजीचे दरम्यान फिर्यादी यांचे राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना यातील मोबाईल धारक यांनी त्याची स्वतःची ओळख लपवुन पंजाब नॅशनल बँकेचा प्रतिनिधी बोलत असल्याची बतावणी करुन फिर्यादी यांना ब्लॉक झालेले डेबीट कार्ड घेण्याची प्रोसेस सांगुन फिर्यादी यांच्या व्हॉटसअॅप वर फाईल पाठवुन फिर्यादी यांच्या मोबाईलचा अनधिकृतपणे अॅक्सेस घेवुन त्यांचे खात्या मधुन एकुण १९,९०,०००/-रुपये घेवुन आर्थिक फसवणुक केली. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे),श्री.अमोल मोरे,मो.नं.९८७०१११४९२ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रांतवाडी पो स्टे ०४/२०२५, भा.न्या.सं.कलम १०८,३(५) |
| **फिर्यादी** | एक इसम, वय ६० वर्षे रा.धानोरी पुणे |
| **आरोपीत** | तीन महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३१/१२/२०२४ रोजी सायं.१७/०० वा.चे सुमा बी २०२ सत्यम राजयोग धानोरी पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा मुलगा प्रफुल हरिचंद्र कदम वय ३५ वर्ष रा.धानोरी पुणे याने वर नमुद तारीख वेळ व ठिकाणी यातील नमुद महिला पत्नी,सासु व मेहुनी हिने वांरवार तुम्ही आम्हाला फसवल आहे तु मरुन जा तु मेला तर मी दुसर लग्न करुन सुखी राहीन असे म्हणुन वारंवार मानसिक त्रास देवुन फिर्यादी यांचे मुलास राहते घरी गळफास घेवुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. (विश्रांतवाडी पो.स्टे.अकस्मात मयत रजी.नं.०१/२०२५ भा.नागरीक सूरक्षा संहीता कलम १९४ अन्वये झाले तपासा वरून दाखल करण्यात आले आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.पदमराज गंपले मो.नं.८८८८८९६१६२ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ३२/२०२५,भा.न्या.सं.कलम ३१९(२),३१८(४) सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम ६६(डी) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ७४ वर्षे, रा.हडपसर पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/१२/२०२४ ते दि.२२/१२/२०२४ रोजी दरम्यान रहाते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना यातील मोबाईल धारक यांनी एमएनजीएल गॅसचे बील भरले नसल्याने गॅस कनेक्शन बंद करण्यात येईल या बाबतचा मेसेज प्राप्त झाल्याने फिर्यादी यांनी सदर मेसेज मधील मोबाईल धारक यांना कॉल करून त्यांचे व्हॉटसअॅप व्दारे प्राप्त झालेली एपीके फाईल डाऊनलोड करण्यास सांगुन त्यामध्ये फिर्यादी यांना बँकेची माहिती भरण्यास सांगुन त्याद्वारे मोबाईलचा ॲक्सेस प्राप्त करून ओटीपी प्राप्त करून फिर्यादी यांचे संमतीविना बँकेचे अकाउंट मधून ट्रान्झक्शन द्वारे त्याचे फायदया करिता रक्कम डेबीट करून फिर्यादी यांची एकुण १८,२५,५९३/-रुपयेची आर्थिक फसवणुक केली. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे),श्री.काळंगे, मो.नं.८१०८८८००९८ |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे १३/२०२५, भा.न्या.सं.कलम १०६(१) |
| **फिर्यादी** | एक महिला वय ३९ वर्षे, रा.कोढवा पुणे |
| **आरोपीत** | इलेक्ट्रीक्शन ठेकेदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०४/०१/२०२५ रोजी दुपारी १४/००.वा सुमा.सर्वे नं.२२,/१/बी,लेन नं.२,प्लॉट नं.११,वृध्दावन नगर,सैनीकवाडी वडगांवशेरी पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे पती युसुफ शेख वय ४७ वर्ष रा.कोंढवा पुणे हे वर नमुद केले ठिकाणी टेरसवर इलेक्ट्रीक्शन व वायरमनचे काम करीत असताना यातील नमुद इसम इलेक्ट्रीक्शन ठेकेदारांनी त्याचे वरील बांधकाम चालु असलेल्या साईट वरील,कामगारांकडुन काम करवुन घेत असताना,कामगारांचे जिवीताचे व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन त्यांना योग्य ती साधनसामुग्री पुरविणे आवश्यक असताना,त्यांना तशी कोणतीही सुरक्षित साधने न पुरविता, टेरसवर इलेक्ट्रीक्शन व वायरमनचे काम करीत असताना लोखंडी सिडीवरुन घसरुन खाली पडल्यांने त्यांच्या डोक्याच्या मागील बाजुस, माणेला,हाताला मार लागुन गंभीर जखमी होऊन मयत झाला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. दिनेश पाटील मो.न.९५९४६९११७७ |
| **७** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे २०/२०२५, भा.न्या.सं.कलम २८१,२८५,२२१ सह मोटार वाहन कायदा कलम ३(१)१८१,४ सह १२२/१७७,१८४ |
| **फिर्यादी** | अमोल पवार, पो.अमंलदार विमानतळ वाहतुक विभाग पुणे |

| | |
|---|---|
| **आरोपीत** | एक इसम वय २५ वर्षे रा.बाबाजान चौक,पुणे (आरोपीतास बीएनएसएस कलम ३५(३) प्रमाणे नोटीस अदा करण्यात आलेली आहे.) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/०१/२०२५ रोजी रात्रौ २०/३० वा.चे सुमा.फोर पॉइंट हॉटेल समोरील सार्वजनिक रोडवर,नगररोड,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी सरकारी काम करत असतांना यातील नमुद इसम याने वाहन चालविण्याचा परवाना नसताना त्याचे ताब्यातील दुचाकी ही विरुध्द दिशेने बेदरकारपणे,निष्काळजीपणाने भरधाव वेगात वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करुन रहदारीस अडथळा निर्माण करुन फिर्यादी यांचेशी हुज्जत घालुन फिर्यादी हे करत असलेल्या सरकारी कामात अडथळा निमार्ण केला. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार , एस.एल.जामदार मो.नं.८५५४९०८०७९ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**